CIN U60100MH2015SGC262054
महा मेट्रो
PUNE METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

**MAHARASHTRA METRO RAIL CORPORATION LIMITED**

**(भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाचा संयुक्त उपक्रम)**

Joint Venture of Govt. of India & Govt. of Maharashtra

**PUNE METRO RAIL PROJECT**

आज़ादी का अमृत महोत्सव

**क्र. महा मेट्रो/पुणे/नियो/नाहप्र/ ९५९ /२०२६** **दि.१५/०४/२०२६**

## सार्वजनिक सूचना

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा-मेट्रो), ही भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांची ५०:५० संयुक्त उपक्रम विशेष उद्देशीय कंपनी (SPV) असून, पुणे महानगर क्षेत्रात पुणे मेट्रो रेल प्रकल्प अंतर्गत विविध मेट्रो मार्गिका राबवित आहे, ज्यामध्ये खालील मार्गिकांचा समावेश आहे:

१. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट: पीसीएमसी ते कृषी महाविद्यालयापर्यंत उन्नत मार्ग (Elevated) व कृषी महाविद्यालय ते स्वारगेट भूमिगत मार्ग (Underground)
२. वनाज ते रामवाडी: उन्नत मार्ग (Elevated)
३. पीसीएमसी ते भक्ती-शक्ती: उन्नत मार्ग (Elevated)
४. स्वारगेट ते कात्रज: भूमिगत मार्ग (Underground)
५. वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी: उन्नत मार्ग (Elevated)
६. खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी बायपास: उन्नत मार्ग (Elevated)
७. एस.एन.डी.टी कॉलेज-वारजे-माणिकबाग: उन्नत मार्ग (Elevated)
८. शासनाकडून वेळोवेळी मंजूर केल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही मेट्रो मार्गिका/विस्तार.

ज्या अर्थी, भारत सरकारने वरील मेट्रो प्रकल्पांना मान्यता दिली असून सदर प्रकल्प मेट्रो रेल्वे (बांधकाम कामे) अधिनियम, १९७८ च्या तरतुदींनुसार अधिनियमित आहेत आणि ज्या अर्थी, सदर अधिनियमातील कलम २० अन्वये, मेट्रो मार्गिकेवर किंवा त्यालगत कोणतेही विकास किंवा पुनर्विकास काम करण्यापूर्वी मेट्रो रेल्वे प्रशासन (MRA) यांची पूर्वपरवानगी बंधनकारक आहे आणि पुढे ज्या अर्थी, कलम १९(f) व १९(g) अन्वये, बोअरवेल ड्रिलिंग किंवा विहीर खणणे, बांधकाम किंवा पाडकाम, भू-तांत्रिक तपासण्या, उत्खनन तसेच कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक किंवा खाजगी पायाभूत सुविधा/उपयुक्तता सेवा टाकणे यांसाठीही पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

वरील नमूद निर्बंध शासनाकडून अधिकृत मान्यता व मंजुरी मिळाल्यानंतर अशा सर्व भविष्यातील मार्गिका व विस्तारांवर आपोआप लागू राहतील.

ज्या अर्थी, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनिमय १४.२.१.७ अन्वये, मेट्रो रेल्वे संरचनांच्या कडेकडून दोन्ही बाजूंना २० मीटर अंतराच्या परिसरात, ज्यामध्ये उन्नत मार्गिका (viaducts), पिअर (pier), स्थानके, प्रवेश-निर्गम (Entry-Exits), डेपो, पूरक संरचना (Ancillary structures), बोगदे (UP व DN लाईन), सबवे तसेच इतर कोणत्याही मेट्रो संरचना यांचा समावेश होतो, सदर अधिनियमातील तरतुदींनुसार व मेट्रो संरचनेच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी, प्रस्तावित कोणत्याही विकास किंवा पुनर्विकासास परवानगी देण्यापूर्वी संबंधित नियोजन प्राधिकरणाने मेट्रो रेल प्रशासनाची पूर्व ना हरकत प्रमाणपत्र (NOC) घेणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा-मेट्रो) यांनी पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना कळविले आहे की, सदर क्षेत्रातील कोणत्याही जमिनीवर पूर्व NOC/परवानगी शिवाय विकास किंवा पुनर्विकास परवानगी देण्यात येऊ नये.

ज्या अर्थी, उंच व भूमिगत दोन्ही प्रकारच्या मेट्रो मार्गिका पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांमधून जात असून, भूमिगत बोगदे खोलीवर तर उंच मार्ग रस्त्यांवरून जात आहेत.

म्हणून, मेट्रो संरचनेचे संरक्षण व सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, सर्व मालमत्ता धारक, भोगवटादार, विकसक, गृहनिर्माण संस्था, इतर संस्था तसेच संबंधित घटकांनी कोणतेही विकास किंवा पुनर्विकास काम, जसे

की बांधकाम/पाडकाम, उत्खनन/पाया संबंधित कामे, भू-तांत्रिक तपासण्या, बोअरवेल ड्रिलिंग किंवा विहीर खोदणे तसेच कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक/खाजगी उपयुक्तता सेवा टाकणे, हे सर्व मेट्रो संरचनांच्या दोन्ही बाजूंना २० मीटर अंतराच्या परिसरात सुरू करण्यापूर्वी महा-मेट्रोकडून पूर्वपरवानगी/NOC घेणे बंधनकारक आहे.

वरील सूचनांचे पालन न केल्यास आणि/अथवा वरील नमूद केलेल्या किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या, तसेच मेट्रो संरचनेवर परिणाम करणाऱ्या किंवा धोका निर्माण करू शकणाऱ्या कामांपैकी कोणतेही काम महा-मेट्रोची पूर्वपरवानगी न घेता केल्यास, मेट्रो संरचनेला झालेल्या कोणत्याही नुकसानीबाबत कायदेशीर परिणाम होतील व त्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्यामध्ये संबंधित मालमत्ता धारक/भोगवटादार यांच्यावर आर्थिक दायित्व राहील तसेच झालेल्या नुकसानीच्या दुरुस्ती खर्चाची वसुली करण्यात येईल आणि लागू कायद्यांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अशा परवानगी/NOC साठीचे अर्ज महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे येथील नियोजन विभागाकडे संबंधित प्राधिकरणामार्फत सादर करावेत. अधिक माहिती व तपशील पुणे मेट्रोच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत (https://www.punemetrorail.org).

**उप महाव्यवस्थापक (नियोजन)**
**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे**